## -:: जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे कार्यवृत्त दिनांक २८.०८.२००९::-

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा दिनांक २८.०८.२००९ रोजी ३.०० वाजता मा. श्री. अविनाश झाडे, जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात घेण्यात आली. सभेच्या सुरवातीला श्री. वाय.सी. उईके, प्रभारी महाव्यवस्थापक, तथा सचिव जिल्हा उद्योग मित्र समिती, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया. यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभेची कार्यवाही सुरु केली.

सभेला खालील निमंत्रित पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते,

१. श्री. अविनाश झाडे, जिल्हाधिकारी.
२. श्री. हूकूमचंद अग्रवाल, अध्यक्ष, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रिज असोसिएशन, गोंदिया.
३. श्री. गजानन अग्रवाल, अध्यक्ष, लाख इंडस्ट्रिज असोसिएशन, तथा सचिव राईस मिलर्स असोसिण्शन, गोंदिया.
४. श्री. व्ही. डी. खिरपुरकर, प्रतिनिधी, कनिष्ठ प्रशिक्षण सल्लागार, औद्योगीक प्रशिक्षण संस्था, गोंदिया.
५. श्री. वाय. सी. उईके, प्रभारी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया
६. श्री. एन. एस. निखारे, उप अभियंता, म. औ. वि. म. उपविभाग, गोंदिया.
७. श्री. सी. बी. वालदे, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, बँक ऑफ इंडीया, गोंदिया.
८. श्री. ए. एस. सोनटक्के, महात्मा फुले विकास महामंडळ, गोंदिया.
९. श्री. जी. जी. येरपुडे, सहाय्यक क्षेत्र व्यवस्थापक, म. औ. वि. म. गोंदिया.

### १) -: मागिल सभेचे कार्यवृत्तास मंजुरी देणे :-

दिनांक २३.०७.२००९ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे कार्यवृत्त सर्व संबंधितांना पाठविण्यात आले. त्यावर कोणाचेही आक्षेप नसल्याचे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले. आक्षेप नसल्यामुळे कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली व सभेची पुढील कार्यवाही पुढे सुरू करण्यात आली.

## २) -: मागील प्रलंबीत विषयावर चर्चा :-

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी निगडीत मुद्दे

- **उष्णा / पॅरॉबॉईल्ड राईस मिलमधू निघणा-या राखेची विल्हेवाट लावणेबाबत :-** उष्णा/पॅराबॉईल्ड राईस मिलमधून निघणा-या राखेची विल्हेवाट लावण्याकरीता निश्चित केलेली बालाघाट रोडवरील जागा बाकीचे राईस मिल दुर असल्याने परवडणार नाही, त्याऐवजी ज्या ज्या भागात राईस मिल आहेत त्या भागाजवळील जागा मिळवून द्यावी किंवा लिजवर द्यावी असे एम.आय.डी.सी. असोसिएशनचे अध्यक्ष श्री हुकुमचंदजी अग्रवाल यानी मुददा उपस्थित केला त्यावर कोणत्या भागात राईस मिल आहेत तशा यादया द्याव्या व एस.डी.ओ. कडून मागणी करावी असे अध्यक्ष महोदयानी सांगीतलेले होते तेव्हा सदर सभेत अध्यक्ष महोदयांनी सांगीतले की महाव्यवस्थापक यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जेव्हा विभागीय अधिकाऱ्यांची सभा असते तेव्हा हजर राहावे व सदर मुद्दा ठेवावा कारण त्या दिवशी सर्व तहसीलदार उपस्थित असतात तेव्हा त्यांचे कडून माहीती उपलब्ध होवू शकेल. तेव्हा विभागीय अधिकाऱ्यांच्या सभेत महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया उपस्थित होते. सभेत चर्चा झाल्याप्रमाणे त्यांनी सांगीतले की, तिरोडा रोड व रतनारा रोडवर मुरूम खाणी आहेत त्या बघण्यासाठी तहसिलदार, असोसिएशनचे पदाधिकारी व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया यांनी तारीख निश्चित करावी व जागेची पाहणी करून त्याबाबत पुढील सभेत अहवाल सादर करावा.

- **एमआयडीसी, गोंदिया परीसरात पोलीस गस्तबाबत :-** एमआयडीसी, गोंदिया परीसरात पोलीस गस्त देत नाही चो-यांचा प्रमाण वाढलेले आहे असे एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष श्री हुकुमचंदजी अग्रवाल यांनी मुद्या उपस्थित केला होता त्यावर अध्यक्ष महोदयांनी पोलीस विभागाल कळवावा असे सभेत सांगितले होते. पोलीस विभागाला पत्र पाठवूनही कोणीही उपस्थित नव्हते तेव्हा पुढच्या सभेस मा. जिल्हा पोलीस अधिक्षकांना विशेष निमंत्रीत म्हणुन आमंत्रित करावे अशी सुचना अध्यक्षांनी केली. होती परंतू अत्यावश्यक कार्यामुळे ते सभेस उपस्थित राहू शकले नाही तेव्हा अध्यक्ष महोदयांनी दूरध्वनीवरून मा. जिल्हा पोलीस अधिक्षकांशी संपर्क साधुन चर्चा केली व एमआयडीसी असोसिशनचे अध्यक्ष श्री हूकूमचंद अग्रवाल यांचेशी चर्चा करवीली तेव्हा पोलीस अधिक्षकांनी त्यांना सांगीतले की असोसिएशनने जागा उपलब्ध करून द्यावी त्यांना कायमस्वरूपी पोलीस चौकी एमआयडीसी, परीसरात नेमुन देवू. यावर अध्यक्ष महोदयांनी सांगीतले की महाव्यवस्थापक यांनी व असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी स्वतः जाउन पोलीस अधिक्षकांना भेटावे व सदर समस्येवर तोडगा काढावा.

- **एमआयडीसी क्षेत्रात ग्राम पंचायत व एमआयडीसी टॅक्सबाबतः-** एमआयडीसी क्षेत्रात ग्राम पंचायत व एमआयडीसी टॅक्स घेत आहेत या संबंधात शासन निर्णय हवा आहे असे एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्षांनी प्रश्न उपस्थित केला त्यावर अध्यक्ष महोदयांनी शासन निर्णय मागविण्यात यावे असे सभेत सांगितले होते. सभेत श्री एन.एस. निखारे, उप-अभियंता, म. औ. वि. म. उपविभाग, गोंदिया. उपस्थित होते त्यांना या संबधात शासनाचे काय निर्देश आहेत व ते ७ दिवसांचे आत गोळा करून स्वतः घेऊन येण्याचे निर्देश अध्यक्ष महोदयांनी दिले.

- **EPF:- Employees Provident Fund:-** उद्योजकांना सहाय्यक आयुक्त, कामगार भविष्य निधी कार्यालयाकडून, कामगार भविष्य निधी सबंधात त्रास दिला जातो असे काही सदस्यांनी सभेत सांगीतले तेव्हा याबाबत उद्योजकांचे काय म्हणने आहे ते त्यांनी महाव्यवस्थापक यांना लेखी तक्रार देवून सादर करावे जेणे करून नियमानुसार पाठपुरावा करण्यात येईल असे अध्यक्षांनी सांगीतले. तेव्हा कामगार आयुक्त कार्यालयास पत्र पाठविण्यात येत आहे असे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले तसेच ज्या उद्योजकांना याबाबत नोटीस प्राप्त झ ााले आहेत त्यांनी त्याच्या प्रती कार्यालयास अर्जासह सादर करण्याची विनंती केली. जेणे करून यादीसह पाठपुरावा करता येईल व या समस्येच्या समाधानाकरीता पुढील सभेत त्यांना आमंत्रित करता येईल. असे सांगीतले.

- **APEDA:- Agricultural and Processed Food Product Export Development Authority:-** यांचे कडून राईस मिलर्सना अनुदान दिले जात होते ते मागील २ वर्षापासुन दिले जात नाही असे औद्योगीक संघटनेने सांगीतले तेव्हा ठाराव पारीत करून शासनाला याबाबत कळविण्याचे निर्देश अध्यक्षांनी दिले. तेव्हा अजुनही संघटनांकडून निवड झालेल्य उद्योग घटकांची यादी प्राप्त झाली नसल्याचे सांगीतले तेव्हा लवकरात लवकर निवड झालेल्य उद्योग घटकांची यादी महाव्यवस्थापक यांचे कडे सादर करावी जेणेकरून पाठपुरावा करता येईल असे अध्यक्ष महोदयांनी सांगीतले.

- **आजारी उद्योग सभा :-** तसेच यानंतर आजारी उद्योगांबाबत चर्चा करण्यात आली तेव्हा महाव्यवस्थापक यांनी सांगीतले की जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया कार्यालयास याबाबत एकही तक्रार किंवा अर्ज आजपावेतो प्राप्त झालेली नाही तेव्हा याबाबत सर्वांनी समाधान व्यक्त केले. व औद्योगीक संघटनांना सांगीतले की या प्रकारचे कुठलेही प्रकरण जर असेल तर ते आजारी उद्योग सभा जी संयुक्तपणे जिल्हा उद्योग मित्र सभेसोबतच घेतली जाते त्यात ठेवावे.

यानंतर आणखी विषय नसल्यामुळे उपस्थितांचे आभार मानुन अध्यक्ष महोदयांचे परवाागीने सभा संपली असे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,<br>उद्योग मित्र समिती सभा<br>गोंदिया . | महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव<br>जिल्हा उद्योग मित्र समिती<br>गोंदिया. |

## -:: जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे कार्यवृत्त दिनांक २३.०७.२००९::-

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा दिनांक २३.०७.२००९ रोजी ४.०० वाजता मा. श्री. अविनाश झाडे, जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात घेण्यात आली. सभेच्या सुरवातीला श्री. वाय.सी. उईके, प्रभारी महाव्यवस्थापक, तथा सचिव जिल्हा उद्योग मित्र समिती, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया. यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभेची कार्यवाही सुरु केली.

सभेला खालील निमंत्रित पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते,

१. श्री. अविनाश झाडे, जिल्हाधिकारी.
२. श्री. हूकूमचंद अग्रवाल, अध्यक्ष, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रिज असोसिएशन, गोंदिया.
३. श्री. प्रमोद ह. अग्रवाल, राणीसती राईस मिल, एमआयडीसी, लघु उद्योजक , गोंदिया.
४. श्री. एम. पी. पराते, क्षेत्र व्यवस्थापक, म. औ. वि. म. नागपूर.
५. श्री. व्ही. डी. खिरपुरकर, प्रतिनिधी, कनिष्ठ प्रशिक्षण सल्लागार, औद्योगीक प्रशिक्षण संस्था, गोंदिया.
६. श्री. वाय. सी. उईके, प्रभारी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया
७. श्री. चंद्रकांत खंडाळकर, कार्यकारी अभियंता, महावितरण, गोंदिया.
८. श्री. एन. एस. निखारे, उप अभियंता, म. औ. वि. म. उपविभाग, गोंदिया.
९. श्री. सी. बी. वालदे, अग्रणी जिल्हा व्यवस्थापक, बँक ऑफ इंडीया, गोंदिया.
१०. श्री. ए. एस. सोनटक्के, महात्मा फुले विकास महामंडळ, गोंदिया.
११. श्री. सचिन शेंडे, राईस मिलर्स असोसिएशन, गोंदिया.
१२. श्री. अजीज एम सोलंकी, राईस मिलर्स असोसिएशन, गोंदिया.
१३. श्री. अशोक अग्रवाल, उद्योजक, गोंदिया.
१४. श्री. रमेशकुमार श्रीराम अग्रवाल, उद्योजक, गोंदिया.

### १) -: मागिल सभेचे कार्यवृत्तास मंजुरी देणे :-

दिनांक १२.०६.२००९ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे कार्यवृत्त सर्व संबंधितांना पाठविण्यात आले. त्यावर कोणाचेही आक्षेप नसल्याचे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले. आक्षेप नसल्यामुळे कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली व सभेची पुढील कार्यवाही पुढे सुरू करण्यात आली.

२)   **-: मागील प्रलंबीत विषयावर चर्चा :-**

**महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी निगडीत मुद्दे**

- **उष्णा / पॅरॉबॉईल्ड राईस मिलमधू निघणा-या राखेची विल्हेवाट लावणेबाबत :-**

उष्णा/पॅराबॉईल्ड राईस मिलमधून निघणा-या राखेची विल्हेवाट लावण्याकरीता निश्चित केलेली बालाघाट रोडवरील जागा बाकीचे राईस मिल दुर असल्याने परवडणार नाही, त्याऐवजी ज्या ज्या भागात राईस मिल आहेत त्या भागाजवळील जागा मिळवून द्यावी किंवा लिजवर द्यावी असे एम.आय.डी.सी. असोसिएशनचे अध्यक्ष श्री हुकुमचंदजी अग्रवाल यानी मुददा उपस्थित केला त्यावर कोणत्या भागात राईस मिल आहेत तशा यादया द्याव्या व एस.डी.ओ. कडून मागणी करावी असे अध्यक्ष महोदयानी सांगीतलेले होते तेव्हा सदर सभेत अध्यक्ष महोदयांनी सांगीतले की महाव्यवस्थापक यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात जेव्हा विभागीय अधिकाऱ्यांची सभा असते तेव्हा हजर राहावे व सदर मुद्दा ठेवावा कारण त्या दिवशी सर्व तहसीलदार उपस्थित असतात तेव्हा त्यांचे कडून माहीती उपलब्ध होवू शकेल.

- **Lan Asseda या घटकांस वाटप करण्यात आलेली आलेली जमीन परत घेण्याबाबत** :-

मे. लॅान ॲसेडा या घटकास वाटप केलेली जमीन न्यायालयीन प्रक्रियेनुसार वित्तीय संस्थेकडे दिल्यामुळे सदर जागा वित्तीय संस्थेने परस्पर विक्री केली आहे. सदर बाब आपल्या अखत्यारीत येत नसल्यामुळे सदर मुद्या वगळण्यात यावा असे मागील सभेत ठरले होते. या सभेत सदर मुद्दा वगळण्यात आला.

- **दुरध्वनी :- एमआयडीसी मध्ये दूरध्वनी सेवा चांगली नसल्याबाबत. :-**

सध्या परीसरात दूरध्वनी सेवा सुरळीत असल्यामुळे सदर मुद्दा वगळण्यात यावा असे निर्देश अध्यक्ष महोदयांनी दिले म्हणुन सदर मुद्दा वगळण्यात आला.

- **गोंदिया जिल्हयाच्या नविन विकास आराखडयामुळे अस्तित्वात असलेल्या उद्योगांना येणाऱ्या अडचणीबाबत:-**

१) शासनाच्या नवीन विकास आराखडा तयार झालेला आहे. पण त्याचे मंजूरी अगोदर तक्रार निवारण समितीचा निर्णय घेतला जाणार आहे. करीता सद्य:स्थितीत या समितीने कुठलीही सुनावणी घेतलेली नाही. समितीचे कार्य सुरु झाल्यावर विकास आराखडयाबददल उद्योगाशी संबंधीत तक्रारी मांडता येतील असे अध्यक्ष महोदयांनी सांगितले होते. त्यावर तक्रारी प्राप्त झाल्या नाही. करीता सदर मुद्दा वगळण्यात यावा असे निर्देश अध्यक्ष महोदयांनी दिले म्हणुन सदर मुद्दा वगळण्यात आला.

२) जिल्हयातील विद्युत भार नियमनाबाबत चर्चा झाली यावर एमआयडीसी, असोसिएशनचे अध्यक्ष श्री हुकुमचंदजी अग्रवाल यांनी सांगितले की, हवा, तुफान आल्यावर होल्टेजची समस्या निर्माण होत असते. त्यावर विद्युत विभागाचे अधिकारी यांनी सांगितले की सबस्टेशन हेड लाईनमध्ये आलेली आहे. यावर सविस्तर चर्चा करण्यात आली व लवकरच उपाययोजना करण्यात येईल असे विद्युत विभागाचे अधिकारी यांनी सांगितले. या सभेत श्री चंद्रकांत

खंडाळकर, कार्यकारी अभियंता यांनी सांगीतले की सर्व उपाययोजना झाल्या आहेत व सेवा सुरळीत सुरू आहे करीता सदर मुद्दा वगळण्यात यावा असे निर्देश अध्यक्षांनी दिले.

३) **नविन विषय** :-

१. एमआयडीसी, गोंदिया परीसरात पोलीस गस्त देत नाही चो-यांचा प्रमाण वाढलेले आहे असे एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष श्री हुकुमचंदजी अग्रवाल यांनी मुद्या उपस्थित केला होता त्यावर अध्यक्ष महोदयांनी पोलीस विभागाल कळवावा असे सभेत सांगितले होते. पोलीस विभागाला पत्र पाठवूनही कोणीही उपस्थित नव्हते तेव्हा पुढच्या सभेस मा. जिल्हा पोलीस अधिक्षकांना विशेष निमंत्रीत म्हणुन आमंत्रित करावे अशी सुचना अध्यक्षांनी केली.

२. एमआयडीसी क्षेत्रात ग्राम पंचायत व एमआयडीसी टॅक्स घेत आहेत या संबंधात शासन निर्णय हवा आहे असे एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्षांनी प्रश्न उपस्थित केला त्यावर अध्यक्ष महोदयांनी शासन निर्णय मागविण्यात यावे असे सभेत सांगितले होते तेव्हा मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना पत्र पाठवुन विचारणा करावी व पुढील सभेत शासन निर्णय मागवावा तसेच शासनाला सुदधा लिहावे असे निर्देश अध्यक्ष महोदयांनी दिले.

३. EPF:- Employees Provident Fund : उद्योजकांना कामगार आयुक्त कार्यालयाकडून कामगार भविष्य निधी करीता त्रास दिला जातो असे काही सदस्यांनी सभेत सांगीतले तेव्हा याबाबत उद्योजकांचे काय म्हणने आहे ते त्यांनी महाव्यवस्थापक यांना लेखी तक्रार देवून सादर करावे जेणे करून नियमानुसार पाठपुरावा करण्यात येईल असे अध्यक्षांनी सांगीतले.

४. APEDA:- Agricultural Processing Export Development Authority:- यांचे कडून राईस मिलर्सना अनुदान दिले जात होते ते मागील २ वर्षापासुन दिले जात नाही असे औद्योगीक संघटनेने सांगीतले तेव्हा ठाराव पारीत करून शासनाला याबाबत कळविण्याचे निर्देश अध्यक्षांनी दिले.

५. तसेच यानंतर आजारी उद्योगांबाबत चर्चा करण्यात आली तेव्हा महाव्यवस्थापक यांनी सांगीतले की जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया कार्यालयास याबाबत एकही तक्रार किंवा अर्ज आजपावेतो प्राप्त झालेली नाही तेव्हा याबाबत सर्वांनी समाधान व्यक्त केले. व औद्योगीक संघटनांना सांगीतले की या प्रकारचे कुठलेही प्रकरण जर असेल तर ते आजारी उद्योग सभा जी संयुक्तपणे जिल्हा उद्योग मित्र सभेसोबतच घेतली जाते त्यात ठेवावे.

यानंतर आणखी विषय नसल्यामुळे उपस्थितांचे आभार मानुन अध्यक्ष महोदयांचे परवाागीने सभा संपली असे जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक यांनी जाहीर केले.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
उद्योग मित्र समिती सभा
गोंदिया .

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग मित्र समिती
गोंदिया.

## -:: जिल्हा उद्योग मित्र समिती सभेचे कार्यवृत्त  दिनांक  १२.०६.२००९::-

जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा दिनांक १२.०६.२००९ रोजी १२.३० वाजता मा. श्री. अविनाश झाडे, जिल्हाधिकारी, गोंदिया यांचे अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालयाचे सभागृहात घेण्यात आली. सभेच्या सुरवातीला श्री. वाय.सी. उईके, प्रभारी महाव्यवस्थापक, तथा सचिव जिल्हा उद्योग मित्र समिती, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया. यांनी उपस्थितांचे स्वागत केले व मा. अध्यक्ष महोदयांचे परवानगीने सभेची कार्यवाही सुरु केली.

सभेला खालील निमंत्रित पदाधिकारी व अधिकारी उपस्थित होते,

१. श्री. अविनाश झाडे , जिल्हाधिकारी.
२. श्री. हूकूमचंद अग्रवाल, अध्यक्ष, एम.आय.डी.सी. इंडस्ट्रिज असोसिएशन, गोंदिया.
३. श्री. प्रमोद ह. अग्रवाल, राणीसती राईस मिल, एमआयडीसी, लघु उद्योजक , गोंदिया.
४. श्री. अनिल अग्रवाल, सी.ए. , गोंदिया.
५. श्री. शंकर कलवानी, मे. महादेव मिनरल्स अँड मेटल्स कं. लघु उद्योजक, गोंदिया.
६. श्री. धर्मरक्षित भोयर, सहायक संचालक, रोजगार स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र, गोंदिया.
७. श्री. घनशाम येरपुडे, सहा. क्षेत्र व्यवस्थापक, म. औ. वि. म. नागपूर.
८. श्री. व्ही. डी. खिरपुरकर, प्रतिनिधी, कनिष्ठ प्रशिक्षण सल्लागार, औद्योगीक प्रशिक्षण संस्था, गोंदिया.
९. श्री. वाय. सी. उईके, प्रभारी महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, गोंदिया
१०. श्री. अ.पं. मुंजे, प्रतिनिधी, सहाय्यक कामगार आयुक्त, गोंदिया
११. श्री. प्रदीप माटे, अधिक्षक अभियंता, महावितरण, गोंदिया.
१२. श्री. एन.एस. निखारे, उप अभियंता, म. औ. वि. म. उपविभाग, गोंदिया.
१३. श्री. योगेश वाघमारे, प्रकल्प अधिकारी, एम.सी.ई.डी., गोंदिया

**१) -: मागिल सभेचे कार्यवृत्तास मंजुरी देणे :-**

दिनांक १५.१२.२००८ रोजी झालेल्या जिल्हा उद्योग मित्र समितीच्या सभेचे कार्यवृत्त सर्व संबंधितांना पाठविण्यात आले. त्यावर कोणाचेही आक्षेप नसल्याचे महाव्यवस्थापक यांनी सभेत सांगीतले. आक्षेप नसल्यामुळे कार्यवृत्तास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली व सभेची पुढील कार्यवाही पुढे सुरू करण्यात आली.

## २) -: मागील प्रलंबीत विषयावर चर्चा :-

## महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाशी निगडीत मुद्दे

➢ **उष्णा / पॅरॉबॉईल्ड राईस मिलमधू निघणा-या राखेची विल्हेवाट लावणेबाबत :-**

उष्णा/पॅराबॉईल्ड राईस मिलमधून निघणा-या राखेची विल्हेवाट लावण्याकरीता निश्चित केलेली बालाघाट रोडवरील जागा बाकीचे राईस मिल दुर असल्याने परवडणार नाही, त्याऐवजी ज्या ज्या भागात राईस मिल आहेत त्या भागाजवळील जागा मिळवून घ्यावे किंवा लिजवर घ्यावे असे एम.आय.डी.सी. असोसिएशनचे अध्यक्ष श्री हुकुमचंदजी अग्रवाल यानी मुददा उपस्थित केला त्यावर कोणत्या भागात राईस मिल आहेत तशा यादया द्यावे व एस.डी.ओ. कडून मागणी करावी असे अध्यक्ष महोदयानी सांगीतले.

➢ **Lan Asseda या घटकांस वाटप करण्यात आलेली आलेली जमीन परत घेण्याबाबत :-**

मे. लॅान ॲसेडा या घटकास वाटप केलेली जमीन न्यायालयीन प्रक्रियेनुसार वित्तीय संस्थेकडे दिल्यामुळे सदर जागा वित्तीय संस्थेने परस्पर विक्री केली आहे. सदर बाब आपल्या अखत्यारीत येत नसल्यामुळे सदर मुद्या वगळण्यात यावा असे मागील सभेत ठरले होते. क्षेत्र व्यवस्थापक ऐवजी उपस्थित अधिका-याला या संबंधात माहीती नसल्यामुळे माहीती देऊ शकले नाही. तेव्हा अध्यक्ष महोदयांनी सुचित केलेली माहीतीसह पुढच्या सभेत क्षेत्र व्यवस्थापकानी प्रत्येक्ष हजर रहावे असे सांगितले.

➢ **दुरध्वनी :- एमआयडीसी मध्ये दूरध्वनी सेवा चांगली नसल्याबाबत. :-**

एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष श्री हुकुमचंदजी अग्रवाल यांनी सांगितले की, ब्रॉड बँड लाईन सुरु झालेली आहे. परंतू पैसे भरुन सुध्दा आतापर्यंत कनेक्शन देण्यात आले नाही. दुरसंचार विभागाचे संबंधीत अधिकारी सभेत उपस्थित नसल्यामुळे चर्चा होऊ शकली नाही. तेव्हा दुरसंचार विभागाचे संबंधीत अधिकारी यांचेशी दूरध्वनीवर संपर्क साधण्याचे अध्यक्षांनी निर्देश दिले.

➢ **गोंदिया जिल्हयाच्या नविन विकास आराखडयामुळे अस्तित्वात असलेल्या उद्योगांना येणाऱ्या अडचणीबाबत:-**

१) शासनाच्या नवीन विकास आराखडा तयार झालेला आहे. पण त्याचे मंजूरी अगोदर तक्रार निवारण समितीचा निर्णय घेतला जाणार आहे. करीता सद्य:स्थितीत या समितीने कुठलीही सुनावणी घेतलेली नाही. समितीचे कार्य सुरु झाल्यावर विकास आराखडयाबददल उद्योगाशी संबंधीत तक्रारी मांडता येतील असे अध्यक्ष महोदयांनी सांगितले होते. त्यावर तक्रारी प्राप्त झाल्या नाही.

२) जिल्हयातील विद्युत भार नियमनाबाबत चर्चा झाली यावर एमआयडीसी, असोसिएशनचे अध्यक्ष श्री हुकुमचंदजी अग्रवाल यांनी सांगितले की, हवा, तुफान आल्यावर होल्टेजची समस्या निर्माण होत असते. त्यावर विद्युत विभागाचे अधिकारी यांनी सांगितले की सबस्टेशन हेड लाईनमध्ये आलेली आहे. यावर सविस्तर चर्चा करण्यात आली व लवकरच उपाययोजना करण्यात येईल असे विद्युत विभागाचे अधिकारी यांनी सांगितले.

३) **नविन विषय** :-

१. एमआयडीसी, गोंदिया परीसरात पोलीस गस्त देत नाही चो-यांचा प्रमाण वाढलेले आहे असे एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष श्री हुकुमचंदजी अग्रवाल यांनी मुद्या उपस्थित केला त्यावर अध्यक्ष महोदयांनी पोलीस विभागाल कळवावा असे सभेत सांगितले.

२. एमआयडीसी क्षेत्रात ग्राम पंचायत व एमआयडीसी टॅक्स घेत आहेत या संबंधात शासन निर्णय हवा आहे असे एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्षांनी प्रश्न उपस्थित केला त्यावर अध्यक्ष महोदयांनी शासन निर्णय मागविण्यात यावे असे सभेत सांगितले.

३. जिल्हा उद्योग मित्र समितीची सभा प्रत्येक महीन्याच्या ३ -या सोमवारला दुपारी ४.०० वाजता घेण्यात यावे असे अध्यक्ष महोदयांनी सभेत सूचना दिल्या.

यानंतर आणखी विषय नसल्यामुळे उपस्थितांचे आभार मानुन अध्यक्ष महोदयांचे परवागीने सभा संपली असे जिल्हा उद्योग केंद्राचे उद्योग निरीक्षक श्री एस.के. गाढवे यांनी जाहीर केले.

जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
उद्योग मित्र समिती सभा
गोंदिया .

महाव्यवस्थापक तथा सदस्य सचिव
जिल्हा उद्योग मित्र समिती
गोंदिया.